॥ श्री ॥

आपली भूमी.. आपला आवाज...

# वीरभूमी

संपादक : महादेव दळे

www.veerbhuminews.com

■ अहिल्यानगर ■ रविवार, दि. ३१ मे २०२६ ■ वर्ष ७ वे ■ अंक ७ वा ■ पाने ४ ■ किंमत ३ रुपये ■ RNI No. MAHMAR / 2012 / 47715 9420802145


*** सुविचार ***

जे होते ते चांगल्या साठीच होत असते

# मनोज जरांगे पाटलांचे उपोषण मध्यरात्री मागे

## सरकारसोबतच्या चर्चेनंतर मोठा निर्णय । मराठा आरक्षणाचा लढा

**● जालना । वीरभूमी –**

मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवली सराटी येथे पुन्हा एकदा आंदोलनाचे हत्यार उपसणारे मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी अखेर मध्यरात्री आपले उपोषण मागे घेतले आहे. राज्य सरकारच्या शिष्टमंडळासोबत प्रदीर्घ काळ चाललेल्या सकारात्मक चर्चेनंतर जरांगे यांनी हा निर्णय जाहीर केला, ज्यामुळे मराठा आंदोलकांमध्ये काहीसा दिलासा मिळाला आहे.

गेल्या काही दिवसांपासून कडक उन्हात, कोणत्याही मंडपाची सुविधा नसताना मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले होते. सततच्या उन्हामुळे त्यांची प्रकृती कमालीची खालावली होती. शिष्टमंडळ भेटीला येण्यापूर्वीच त्यांना उलट्यांचा त्रास सुरू झाल्याने आंदोलनस्थळी उपस्थित मराठा बांधवांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते.

मसुदा नाकारल्यापासून तोडग्यापर्यंत सरकारने यापूर्वी पाठवलेला मसुदा सुरुवातीला जरांगे पाटील यांनी अमान्य केला होता आणि शिष्टमंडळाला माघारी पाठवले होते. मात्र, परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पडद्यामागून हालचाली सुरू झाल्या.

अंतरवली गावातील सरपंच पांडुरंग तारख यांच्या निवासस्थानी मराठा आरक्षण अभ्यासक, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि भाजप



आमदार प्रसाद लाड यांची एक गुप्त बैठक पार पडली.या बैठकीत चर्चेतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यानंतर विखे पाटील आणि प्रसाद लाड पुन्हा एकदा जरांगे पाटलांकडे गेले. तब्बल दीड तास चाललेल्या सविस्तर चर्चे नंतर, सरकार आणि आंदोलनकर्ते एका निर्णयावर पोहोचले आणि त्यानंतरच मध्यरात्री जरांगे यांनी उपोषण सोडले.

सरकारसमोर जरांगे पाटलांनी आपल्या मागण्यांचा अजेंडा स्पष्ट ठेवला होता, ज्यावर तोडगा काढण्याचे आश्वासन मिळाले आहे:

१. कुणबी प्रमाणपत्र : मराठवाड्यातील सर्व मराठ्यांना तातडीने कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करणे.

२. संस्थानांचे जीआर : सातारा, कोल्हापूर, औंध, पुणे आणि मिरज संस्थानांचे १९९४ च्या धर्तीवर तात्काळ शासन निर्णय (जीआर) निर्गमित करणे.

३. गुन्हे मागे घेणे: आंदोलकांवरील महाराष्ट्रातील सर्व सरसकट गुन्हे त्वरित मागे घेणे.

४. बलिदान देणाऱ्यांना नोकरी : आंदोलनात प्राण गमावलेल्यांच्या कुटुंबीयांना महावितरण आणि MIDC मध्ये नोकरी देण्याचा GR काढणे.

५. सारथी योजना: 'सारथी' संस्थेच्या सर्व थांबलेल्या योजना पुन्हा पूर्ण क्षमतेने सुरू करणे.

६. महामंडळ परतावा: महामंडळाचे सर्व रखडलेले परतावे ताबडतोब वाटप करणे.

७. व्हॅलिडिटी प्रमाणपत्र : कुणबी प्रमाणपत्र मिळालेल्यांना तात्काळ जात वैधता प्रमाणपत्र मिळवून देणे.

८. उपसमिती बरखास्त: सद्यस्थितीत असलेली मराठा उपसमिती बरखास्त करणे.

९. स्वतंत्र मंत्रालय: कुणबी आणि मराठा समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करणे.

१०. शिंदे समितीला मुदतवाढ: जुन्या नोंदी तपासण्यासाठी शिंदे समितीला मुदतवाढ देऊन काम गतीने करणे.

आता या मागण्यांच्या अंमलबजावणीकडे संपूर्ण मराठा समाजाचे लक्ष लागले असून, सरकार यावर किती वेगाने पावले उचलते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## SPOT NEWS

### दिल्ली-मुंबईत हल्ल्याची तयारी करणारे ९ दहशतवादी अटकेत

**● नवी दिल्ली –** देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाची कारवाई करताना, दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने एका मोठ्या दहशतवादी कटाचा पर्दाफाश केला आहे. पाकिस्तानची गुप्तचर संस्था आयएसआय आणि दाऊद इब्राहिमच्या अंडरवर्ल्ड नेटवर्कशी संबंधित ९ संशयित हस्तकांना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्रे, ग्रेनेड आणि स्फोटके जप्त करण्यात आली आहेत. तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार, हे दहशतवादी दिल्ली आणि मुंबईतील अत्यंत वर्दळीची आणि संवेदनशील ठिकाणे उद्ध्वस्त करण्याच्या तयारीत होते. त्यांच्या निशाण्यावर प्रामुख्याने धार्मिक स्थळे आणि सरकारी इमारती, मंत्रालये आणि सुरक्षा दलांची कार्यालये व देशातील अणुकेंद्रे, प्रमुख विमानतळ, रेल्वे स्थानके आणि वीज निर्मिती केंद्र आहेत.

### डिजिटल अर्थव्यवस्थेत भारताचा जगात पाचवा क्रमांक

**● नवी दिल्ली –** भारताच्या डिजिटल क्रांतीला आणखी एक मोठे यश मिळाले असून देश जगातील पाचवी सर्वाधिक डिजिटलाइज्ड अर्थव्यवस्था बनला आहे. इंडियन कौन्सिल फॉर रिसर्च ऑन इंटरनॅशनल इकॉनॉमिक रिलेशन्स यांनी प्रसिद्ध केलेल्या 'इंडियाज डिजिटल इकॉनॉमी-२०२६' अहवालात हा महत्त्वपूर्ण निष्कर्ष समोर आला आहे. विशेष म्हणजे, डिजिटल कामगिरीच्या बाबतीत भारताने जर्मनी, फ्रान्स, जपान आणि कॅनडा यांसारख्या विकसित अर्थव्यवस्थांनाही मागे टाकत जागतिक स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. अहवालानुसार, डिजिटल क्षेत्रातील वेगवान वाढ, मजबूत इंटरनेट कनेक्टिव्हिटी, फिनटेक क्षेत्रातील प्रगती आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील वाढती क्षमता यामुळे भारताने ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे. जगाच्या एकूण जीडीपीच्या ९६ टक्के हिस्सा असलेल्या ७१ देशांच्या तुलनात्मक अभ्यासातून भारताची डिजिटल ताकद स्पष्ट झाली आहे. अवघ्या एका वर्षात तीन स्थानांची झेप घेत भारत पाचव्या क्रमांकावर पोहोचला आहे.

## शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश वाटप बंधनकारक

**● मुंबई । वीरभूमी –**

शाळा सुरू झाल्यानंतरही विद्यार्थ्यांच्या गणवेश वाटपात होणाऱ्या दिरंगाईची राज्य सरकारने गंभीर दखल घेतली आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी गणवेश वाटप करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

तसेच, गणवेशाचे कापड निकृष्ट दर्जाचे आढळल्यास पुरवठादार, संबंधित शाळा व्यवस्थापन समितीवर कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा शालेय शिक्षण विभागाने दिला आहे. गणवेशाचे दर्जेदार कापड, शाळा सुरू होण्याच्या पहिल्याच दिवशी वाटप, स्थानिक महिला बचत गटांकडून शिलाई तसेच गुणवत्तेची कठोर तपासणी, या बाबी अनिवार्य करण्यात आल्या आहेत.

विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी गणवेश मिळावा, यासाठी शाळा व्यवस्थापन समित्यांना जबाबदारी देण्यात आली आहे. गणवेशावर समग्र शिक्षा अभियानाचा लोगो लावणेही बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय, विद्यार्थ्यांच्या दोन गणवेशांपैकी एक गणवेश स्काऊट-गाईड उपक्रमाला अनुरूप असावा, असेही शासनाने स्पष्ट केले आहे.

मुलांसाठी आकाशी रंगाचा शर्ट व गडद निळ्या रंगाची हाफ पँट आणि मुलींसाठी आकाशी रंगाचा शर्ट व गडद निळ्या रंगाचा स्कर्ट असलेला पिनो फ्रॉक. तसेच, ज्या शाळांमध्ये सलवार कमीज असेल तर सलवार गडद निळ्या रंगाचा व कमीज आकाशी रंगाची अशी रचना असणार आहे.

## कापूस आयातीवरील सीमा शुल्क हटविले

**● नवी दिल्ली । वीरभूमी –**

कापसाच्या आयातीसंदर्भात केंद्र सरकारनं मोठा निर्णय घेतला आहे. कापूस आयातीवरील सीमाशुल्क पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. देशातील वस्त्रोद्योग आणि कापड उद्योगाला दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने कापूस आयातीवरील सर्व प्रकारचे सीमाशुल्क पूर्णपणे माफ केले आहे. ही सवलत १ जून २०२६ ते ३० ऑक्टोबर २०२६ या ५ महिन्यांच्या कालावधीसाठी लागू असणार आहे.

बेसिक कस्टम ड्युटीसोबतच कृषी पायाभूत सुविधा आणि विकास उपकरही माफ करण्यात आला आहे. यामुळे बाजारात कापसाची उपलब्धता वाढणार असून कच्च्या मालाचे भाव नियंत्रणात येण्यास मदत होईल, असे सरकारकडून सागण्यात आले. केंद्रीय अर्थमंत्रालयाने (महसूल विभाग) जारी केलेल्या अधिसूचनेनुसार देशात आयात होणा-या कापसावरील सर्व सीमा शुल्क तात्पुरते माफ करण्यात आले. भारतीय वस्त्रोद्योगासाठी हा एक मोठा दिलासा मानला जात आहे.

या निर्णयाचा सर्वाधिक फायदा लघु आणि मध्यम उद्योगांना होणार आहे. कापसाचा स्थिर पुरवठा उपलब्ध झाल्यास वस्त्रोद्योगाची उत्पादन क्षमता आणि बाजारातील स्पर्धात्मकता वाढण्यास मदत होईल. हा निर्णय सीमाशुल्क कायदा १९६२ आणि वित्त कायदा २०२१ अंतर्गत महसूल विभागाने जारी केला आहे. सार्वजनिक हित लक्षात घेऊन ही सवलत देणे आवश्यक असल्याचे सरकारने म्हटले आहे.

# तनपुरेंचा भाजपमध्ये प्रवेश; कर्डीले विजयासह सुजय विखे पाटील यांचा 'डबल स्ट्राइक'

## राहुरी पोटनिवडणुकीपासून भाजप प्रवेशापर्यंत डॉ. सुजय विखे यांची महत्त्वाची भूमिका । अहिल्यानगरच्या राजकारणात नवी समीकरणे

**● मुंबई । वीरभूमी –**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे प्रमुख नेते, माजी मंत्री तथा जयंत पाटील यांचे भाचे प्राजक्त तनपुरे यांनी आज भारतीय जनता पक्षात अधिकृत प्रवेश केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई येथील पक्ष कार्यालयात हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

भाजपमध्ये प्रवेशासोबतच प्राजक्त तनपुरे यांची विधान परिषदेवरील उमेदवारीही जवळपास निश्चित मानली जात आहे. या घडामोडीमुळे शरद पवार गटाला अहिल्यानगर जिल्ह्यात मोठा राजकीय धक्का बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. राज्यात राज्यमंत्री म्हणून काम केलेल्या तनपुरे यांचा भाजप प्रवेश हा जिल्ह्याच्या राजकारणातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

दरम्यान, राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत भाजप उमेदवार अक्षय कर्डीले यांना उमेदवारी मिळवून देण्यापासून ते त्यांना विजयी करून विधानसभेत पाठविण्यापर्यंतच्या संपूर्ण राजकीय घडामोडींमध्ये डॉ. सुजय विखे पाटील यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली.

पक्षांतर्गत समन्वय साधत त्यांनी भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाशी सातत्याने संपर्क ठेवला. उमेदवारी निश्चित झाल्यानंतर त्यांनी स्वतः प्रचार मैदानात उतरून राहुरी, नगर आणि पाथर्डी मतदारसंघांत प्रचाराची प्रभावी धुरा सांभाळली. तब्बल ११ हून अधिक सभा घेत त्यांनी पक्ष संघटना आणि कार्यकर्त्यांना एकत्र बांधत अक्षय कर्डीले यांच्या विजयासाठी पोषक वातावरण निर्माण केले. त्यामुळे कर्डीले यांच्या विजयामागील प्रमुख रणनीतिकार म्हणून डॉ. सुजय विखे पाटील यांच्याकडे पाहिले जात होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मध्यस्थीनंतर प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी विधानसभा पोटनिवडणूक न लढविण्याचा निर्णय घेतला होता. विशेष म्हणजे, पोटनिवडणूक जाहीर होण्यापूर्वी सुमारे सहा महिन्यांपासून डॉ. सुजय विखे पाटील हे प्राजक्त तनपुरे यांच्या संपर्कात असल्याची माहिती राजकीय वर्तुळात चर्चिली जात होती.

याच राजकीय रणनीतीचा पुढचा टप्पा म्हणून प्राजक्त तनपुरे यांचा भाजप प्रवेश घडून आल्याचे मानले जात आहे. जिल्ह्यातील बदलत्या राजकीय समीकरणांचा अचूक अंदाज घेत डॉ. सुजय विखे पाटील यांनी तनपुरे यांच्याशी संवाद कायम ठेवला आणि त्यांना भाजपमध्ये आणण्यासाठी पडद्यामागून महत्त्वाची भूमिका बजावली.




एकीकडे अक्षय कर्डीले यांना आमदार करण्यात यश मिळवताना, दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसमधील प्रभावी चेहरा असलेल्या प्राजक्त तनपुरे यांना भाजपमध्ये आणण्याची रणनीतीही त्यांनी यशस्वीपणे राबवली. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात भाजपची ताकद वाढविण्यामागे आणि नव्या राजकीय समीकरणांची जुळवाजुळव करण्यामागे डॉ. सुजय विखे पाटील हेच प्रमुख सूत्रधार ठरल्याची चर्चा जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात रंगली आहे.

SPOT NEWS

## देवठाणच्या किरण गायकवाड यांची मुंबई पोलिस दलात निवड

**अकोले । वीरभूमी–**

अकोले तालुक्यातील देवठाण येथील किरण सुगंधराव



गायकवाड यांची नुकत्याच जाहीर झालेल्या मुंबई पोलीस भरतीमध्ये निवड झाल्याने देवठाण परिसरात आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या या यशाबद्दल गावातील विविध संस्था व संघटनांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. अखंड हरिनाम सप्ताह समिती, जनसेवा ग्रामीण विकास मंडळ तसेच जनजागृती युवक मंडळ यांच्या वतीने किरण गायकवाड यांचा गौरव करण्यात आला. किरण यांनी लहानपणापासूनच पोलीस होण्याचे स्वप्न पाहिले होते. कोणत्याही प्रकारचा गाजावाजा किंवा प्रसिद्धी न करता त्यांनी गेली दोन वर्षे सातत्याने अभ्यास आणि व्यायाम सुरू ठेवला. त्यांच्या मेहनती, चिकाटी आणि शिस्तबद्ध तयारीमुळे त्यांना हे यश मिळाल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. त्यांच्या निवडीबद्दल देवठाण परिसरातून सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत असून युवकांसाठी ते प्रेरणास्थान ठरत आहेत.

## राहत्या जागेतून हाकलण्याचा प्रयत्न पोलीस संरक्षणाची मागणी

**अहिल्यानगर । वीरभूमी–**

पाथर्डी तालुक्यातील बडेवडगाव येथील दशरथ साळूराम खवले यांना राहत असलेल्या जागेतून जबरदस्तीने हाकलण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करण्यात आला असून संबंधितांकडून वारंवार धमक्या दिल्या जात असल्याने पोलीस संरक्षण देण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत एकलव्य भिल्ल संघटनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. दशरथ खवले हे मौजे बेल पारा येथे मागील ४० ते ४५ वर्षांपासून वास्तव्यास आहेत. मजुरी, खड्डे खोदकाम व इतर श्रमाची कामे करून ते उदरनिर्वाह करतात. त्यांनी निवेदनात म्हटले आहे की, सुमारे ४० ते ४५ वर्षांपूर्वी सदर जागेत राहण्यासाठी त्यांनी सोमनाथ पांगरे यांना २० ते ३० हजार रुपये दिले होते. त्यानंतर ते सातत्याने त्या ठिकाणी वास्तव्यास आहेत. दरम्यान, सोमनाथ आश्रुबा पांगरे, आशाबाई सोमनाथ पांगरे व जनार्धन सोमनाथ पांगरे हे वारंवार जागा खाली करण्यासाठी दबाव टाकत असल्याचा आरोप खवले यांनी केला आहे. संबंधित व्यक्तींकडून शिवीगाळ, दमदाटी तसेच जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. खवले यांनी पुढे म्हटले आहे की, संबंधितांनी बुलडोझर लावून त्यांच्या राहत्या घराचे छप्पर पाडले तसेच ये–जा करण्याच्या रस्त्यावर काटे टाकून त्रास दिला. कोणतीही नोटीस अथवा कायदेशीर कागदपत्रे न देता अचानक जागा खाली करण्यासाठी दबाव आणला जात आहे. गेल्या दहा ते बारा दिवसांपासून फोनवरूनही धमक्या दिल्या जात असून, जागा मोकळी करा अन्यथा जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. मी गरीब, अशिक्षित व मजुरी करून उदरनिर्वाह करणारा मागासवर्गीय वडारी समाजातील नागरिक असल्याने मला बेघर करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचेही खवले यांनी म्हटले आहे. संबंधितांकडून कधीही मारहाण अथवा जबरदस्तीने घर खाली करण्याचा प्रयत्न होऊ शकतो, त्यामुळे जीवितास धोका निर्माण झाल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. सदर प्रकरणाची तात्काळ चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कारवाई करावी तसेच पोलीस संरक्षण द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

# टाकळी ढोकेश्वर आणि भाळवणीत पोलिसांची मोठी कारवाई

**७ हॉटेल्सवर छापे, ८३ हजारांचा मुद्देमाल जप्त**

**पारनेर । वीरभूमी –**

पारनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत बेकायदेशीरपणे देशी व विदेशी दारूची विक्री करणाऱ्या हॉटेल्सवर एमआयडीसी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. वेगवेगळ्या ७ ठिकाणी एकाच वेळी टाकलेल्या छाप्यांमध्ये पोलिसांनी ८३,४९० रुपये किमतीचा अवैध दारू साठा जप्त केला असून, ७ आरोपींना ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध धंदे चालकांचे धाबे दणाणले आहेत.



अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांना पारनेर हद्दीतील भाळवणी, टाकळी ढोकेश्वर आणि भनगडेवाडी या गावांमध्ये अवैध दारू विक्री सुरू असल्याच्या तक्रारी मिळाल्या होत्या. त्यानुसार त्यांनी कडक कारवाईचे आदेश दिले. एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी विशेष पथकासह २८ मे रोजी ही धडक मोहीम राबवली. पोलिसांनी विविध हॉटेल्सवर छापे टाकून खालील आरोपींना मुद्देमालासह अटक केली. हॉटेल साई चायनीज (भाळवणी) अजय बापू भिसे (मुद्देमाल: ९,४१५), हॉटेल मदुरा (भाळवणी)बाबासाहेब सिताराम रोहोकले (मुद्देमाल: ८,१८५) हॉटेल समाधान (भनगडेवाडी) शुभम किरण रोहोकले (मुद्देमाल: १३,४४०), हॉटेल न्यू समाधान (भनगडेवाडी) धिरज बाजीराव ठोकळ (मुद्देमाल: १३,४३०), हॉटेल वर्षा (टाकळी ढोकेश्वर) दिनकर आनंदा नवले (मुद्देमाल: १७,२८५), हॉटेल रायबा (भाळवणी) महेश गोरख रोहोकले (मुद्देमाल: ६,१२०), हॉटेल गावकरी (टाकळी ढोकेश्वर) महेश कृष्णाजी उर्फ बाबासाहेब झावरे (मुद्देमाल : १५,६१५) पकडण्यात आलेले सर्व आरोपी आणि जप्त केलेला मुद्देमाल पुढील कायदेशीर कारवाईसाठी पारनेर पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आला आहे. त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५(ई) नुसार एकूण ७ गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि माणिक चौधरी, पोसई विनोद परदेशी आणि त्यांच्या विशेष पोलीस पथकाने केली. नगर–कल्याण हायवेवरील टाकळी ढोकेश्वर, भाळवणी, भानगडेवाडी, ढोकी आणि सावरगाव काळेवाडी या गावांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून अवैध दारूची विक्री सुरू होती. हायवे लगतच्या हॉटेल्स आणि धाब्यांवर छुप्या पद्धतीने चालणाऱ्या या अवैध धंद्यांमुळे स्थानिक नागरिक, महिला आणि प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. पोलिसांच्या या कडक कारवाईमुळे सर्वसामान्य नागरिकांनी समाधान व्यक्त केले असून, अशा कारवाया पुढेही सुरू ठेवण्याची मागणी होत आहे.

## धार्मिक कार्यक्रमादरम्यान अल्पवयीन मुलीची छेडछाड

**पाथर्डी । वीरभूमी–**




पाथर्डी तालुक्यातील ग्रामीण भागातील एका चौदावर्षीय अल्पवयीन मुलीची गावात मोठा धार्मिक कार्यक्रम सुरू असताना एका जिहादी मानसिकतेच्या तरुणांकडून जाणिवपूर्वक अपमान जनक व लज्जा उत्पन्न होईल अशी छेड काढण्यात आली. या घटनेनंतर पिडीताचा मावसभाऊ आरोपीस जाब विचारण्यासाठी गेला असता आरोपीने त्यास ही शिवीगाळ करत मारहाण केल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, याप्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात रात्री उशिरा बाल अत्याचार विरोधी कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलीच्या कुटुंबीयांनी दिलेल्या माहीती व फिर्यादीवरून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. आरोपीच्या शोधात पोलिस पथक तातडीने रवाना करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका गावात मोठा धार्मिक कार्यक्रम सुरू असुन सदर धार्मिक कार्यक्रमासाठी ही पिडीता आपल्या वयोवृध्द आजी सोबत जात असताना आरोपीने अल्पवयीन मुलीची छेड काढली इयत्ता दहावीत शिकणाऱ्या या मुलीने त्यास विरोध केला असता आरोपी तेथुन फरार झाला परत दुसऱ्या दिवशी ही आरोपीने पुन्हा मुलीची छेड काढली असता पिडितेने आपल्या मावसभावास व्यथा व हकीकत सांगितली पिडीतेचा मावसभाऊ याने आरोपीस जाब विचारला असता आरोपीने त्याला ही शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

घटनेनंतर मुलीच्या नातेवाईकांनी पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदवली. या प्रकरणात पोलिसांनी अल्पवयीन मुलीच्या संरक्षणासंदर्भातील कायद्यांतर्गत तसेच बाल अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून संबंधित संशयितांचा शोध सुरू आहे. दरम्यान, या घटनेमुळे गावात व परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून सदर विकृत व जिहादी मानसिकतेच्या आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## कोपरगावातील निवासी अतिक्रमणे नियमित होणार; नागरिकांना मिळणार हक्काचे सातबारा उतारे

**डिसेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करण्याचे नगराध्यक्ष पराग संधान यांचे आवाहन**

**कोपरगाव । वीरभूमी–**

कोपरगावनगरपरिषदहद्दीतील निवासी अतिक्रमणे नियमित करून संबंधित नागरिकांना हक्काचे सातबारा उतारे देण्यात येणार असून पात्र नागरिकांनी आवश्यक कागदपत्रांसह ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत नगरपरिषदेकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहन नगराध्यक्ष पराग संधान यांनी केले आहे.



> कोपरगाव शहरातील लक्ष्मीनगरसह अनेक भागांमध्ये अनेक वर्षांपासून अतिक्रमणधारकांना स्वतःच्या हक्काचे उतारे मिळत नव्हते. या विषयासंदर्भात मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांनी सन २०१९ मध्ये विशेष पाठपुरावा करून सविस्तर प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत संचालक नगररचना, पुणे यांच्याकडे पाठविला होता. तसेच हा प्रश्न मार्गी लागावा यासाठी आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला. या प्रयत्नांना अखेर यश आले आहे.
>
> – **पराग संधान,** नगराध्यक्ष, कोपरगाव

नगरपरिषद हद्दीतील हनुमाननगर, इंदिरानगर, दत्तनगर, महादेवनगर, गजानननगर, गांधीनगर, टिळकनगर, संजयनगर, सुभाषनगर, लक्ष्मीनगर, साईनगर, येवला रोड, खडकी, जिजामाता उद्यान तसेच दत्त पार टाकळी नाक्यामागील बेट भागातील निवासी अतिक्रमणे शासनाच्या नियमानुसार नियमित करण्यात येणार आहेत.

या संदर्भात कोपरगाव नगरपरिषदेच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे शहरातील अतिक्रमित जागा नियमानुकूल करून संबंधित लाभार्थ्यांच्या नावावर सातबारा उतारे देण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानुसार शिर्डीचे प्रांताधिकारी माणिकराव आहेर यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि. २० मे रोजी पहिल्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीत नगराध्यक्ष पराग संधान यांनी अतिक्रमित भागातील नागरिकांच्या समस्या मांडल्या. महसूल विभागाने यासंदर्भातील सुधारित अध्यादेश नुकताच जारी केला असून, १ जानेवारी २०११ पूर्वीची निवासी अतिक्रमणे असलेल्या नागरिकांना राज्य शासन व महसूल विभागाकडून मोठा दिलासा मिळाला आहे.

शासनाच्या नवीन धोरणात्मक जीआरनुसार शहरातील सुमारे पाच हजार प्रॉपर्टी पात्र ठरण्याची शक्यता असून त्यामुळे सातबारा वाटप प्रक्रियेला गती मिळणार आहे.

शहरातील अतिक्रमित भागातील नागरिकांसाठी ६ जून २०२६ पासून छापील अर्ज संबंधित विभागाकडे उपलब्ध होणार आहेत. अर्जासोबत मालमत्ता कर नोंदवही, अतिक्रमण सर्वेक्षण नोंदवही, १ जानेवारी २०११ दरम्यानचे वीज बिल, उपलब्ध असल्यास उपग्रह छायाचित्र तसेच गावठाण क्षेत्रातील भू–मालकी नसलेल्या लाभार्थ्यांसाठी मागील तीन वर्षांच्या मालमत्ता कर पावत्या आदी कागदपत्रे जोडणे आवश्यक राहणार आहे. पात्र लाभार्थ्यांनी संबंधित विभागाशी संपर्क साधून ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन नगराध्यक्ष पराग संधान यांनी केले आहे.


# भगवानगडासाठी ॲड. प्रतापराव ढाकणे परिवाराकडून ५१ लाखांची देणगी जाहीर

**पाथर्डी । वीरभूमी–**

तालुक्यातील अकोले येथे अधिक मासानिमित्त आयोजित राष्ट्रसंत भगवान बाबा यांनी प्रारंभ केलेल्या २२ व्या भव्य अखंड हरीनाम सप्ताहाची शुक्रवारी भक्तिमय वातावरणात काल्याचे किर्तनाने सांगता झाली. सप्ताहाच्या अंतिम दिवशी ह.भ.प. डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांच्या रसाळ वाणीतून झालेल्या कीर्तनाने उपस्थित हजारो भाविक मंत्रमुग्ध झाले. सप्ताहभर भागवत कथा, कीर्तन आणि विविध धार्मिक कार्यक्रमांमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात नाहुन निघाला. या कार्यक्रमात भगवानगडासाठी स्व. बबनराव ढाकणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रतापराव ढाकणे यांनी ५१ लाख रुपयांची देणगी जाहीर केली.

या सप्ताहात ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांच्या अमृतमय वाणीतून श्रीमद्भागवत कथा पार पडली. तसेच ह.भ.प. कृष्णा महाराज भगवानगड, विलास महाराज गजगे, सोपान महाराज शास्त्री, ज्ञानेश्वर महाराज जळकेकर, निवृत्ती महाराज इंदुरीकर, तुकाराम महाराज मुंडे आणि जगन्नाथ महाराज यांच्या हरिकीर्तनांनी वातावरण अधिकच भक्तिमय झाले.

सप्ताहाच्या सांगता सोहळ्यात बोलताना डॉ. नामदेव शास्त्री म्हणाले की, मुलावर विश्वास ठेवा, जगन्नाथ महाराज अत्यंत उत्तम नियोजन करत आहेत. नवीन महाराजही चांगले कार्य करत असून दसऱ्यानंतर कृष्णा महाराज भगवानगडाचा कारभार सांभाळणार आहेत. खर्डा ते बुलढाणा परिसरापर्यंत भगवानगडाचे कार्य अधिक व्यापक आणि प्रभावी स्वरूपात उभे राहणार आहे. इतिहासातील आठवणींना उजाळा देत त्यांनी. भगवानगड येथे साजरा झालेला शताब्दी महोत्सव हा राज्यभरातील भक्तांसाठी ऐतिहासिक पर्व ठरल्याचेही त्यांनी नमूद केले. भविष्यात भगवानगडाच्या माध्यमातून गावोगावी ज्ञानेश्वर पारायण, ज्ञानदान, अन्नदान आणि विविध धार्मिक–सामाजिक उपक्रम प्राधान्याने राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. लाखो रुपयांची विकासकामे आणि समाजोपयोगी उपक्रम राबवून भगवानगडाचे कार्य अधिक व्यापक करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. सप्ताहाचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल जगन्नाथ महाराज यांचे विशेष कौतुक करण्यात आले. पंढरपूर ते थेट लंडनपर्यंत विठ्ठल भक्तीचा संदेश पोहोचविणारे चिंचपूर इजदे येथील अशोक खेडकर यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. संत भगवान बाबांच्या पुण्यतिथी उत्सवाची विदेशातही नव्याने सुरुवात करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. यावेळी



केदारेश्वरचे माजी अध्यक्ष प्रतापराव ढाकणे यांनी भगवानगडासाठी स्व. बबनराव ढाकणे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ५१ लाख रुपयांची देणगी देण्यात येणार असल्याचे जाहीर केले. ढाकणे परिवार आणि भगवानगड हे एक वेगळेच नाते आहे, असे भावनिक उद्गार त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या या घोषणेनंतर उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. कार्यक्रमास कृष्णा महाराज भगवानगडकर, जगन्नाथ महाराज यांच्यासह पंचक्रोशीतील हजारो भाविक, महिला वर्ग, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कीर्तनानंतर चौथे मठाधिपती कृष्णा महाराज भगवानगड यांच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. भगवान बाबा की जयच्या जयघोषात आणि हरिनामाच्या अखंड गजरात या भव्य अखंड हरीनाम सप्ताहाची भक्तिमय वातावरणात उत्साहपूर्ण सांगता झाली.

# SPOT NEWS

## सावेडीतील गोळीबाराला वेगळे वळण; फिर्यादीच निघाला सूत्रधार ?

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

शहरातील पाईपलाईन रोडवरील पुणेरी चहा परिसरात झालेल्या प्राणघातक हल्ला प्रकरणाला आता धक्कादायक वळण मिळाले आहे. सुरुवातीला किरकोळ वादातून झालेला जीवघेणा हल्ला म्हणून पाहिले जात असलेले हे प्रकरण आता मोठ्या कटकारस्थानाच्या दिशेने वळल्याची माहिती पोलिस तपासातून समोर येत आहे. या प्रकरणाचा तपास करताना तोफखाना पोलिसांनी भिंगार येथील ऋतिक हरिहर याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, जखमी चिरंजीव गाढवे यानेच स्वतःवर हल्ला घडवून आणण्यासाठी सुपारी दिल्याचा संशय पोलिसांकडून व्यक्त केला जात आहे. इतराला अडकविण्यासाठी लावलेल्या जाळ्यात स्वतःच अडकल्याचे पोलीस तपासात पुढे येत आहे. या धक्कादायक घडामोडीमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. तपासादरम्यान पोलिसांनी ऋतिक हरिहर याच्याकडून पिस्टल जप्त केल्याची माहिती समोर आली आहे. तसेच, चार अल्पवयीन मुलांच्या माध्यमातून हा हल्ला घडवून आणल्याचे तपासात समोर येत आहे. या प्रकरणात फिर्यादीच सूत्रधार? अशी चर्चा रंगली आहे. दरम्यान, तोफखाना पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास सुरू ठेवला असून, पुढील चौकशीत आणखी काही मोठे आणि धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## श्रीक्षेत्र चोंडीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त महोत्सव

**● अहिल्यानगर । वीरभूमी–**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त जामखेड तालुक्यातील श्रीक्षेत्र चोंडी येथे २९, ३० व ३१ मे २०२६ दरम्यान भव्य जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या ऐतिहासिक सोहळ्यास सर्व अहिल्याभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केले आहे. या महोत्सवासाठी राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री अतुल सावे, अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य, खासदार, आमदार आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. भारत निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करणे तसेच कार्यक्रमाचा कोणत्याही प्रकारे राजकीय लाभ घेऊ नये, या अटींसह महोत्सवास परवानगी दिली आहे. शुक्रवार, २९ मे रोजी सायंकाळी ७ वाजता आमदार गोपीचंद पडळकर यांच्या संकल्पनेतून भामाबाई शंकरराव शिंदे यांच्या हस्ते मंदिरावरील विद्युत रोषणाई व भव्य दीपमहोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. शनिवार, ३० मे रोजी रात्री ७.३० वाजता कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कवी संमेलनात युगकवी डॉ. कुमार विश्वास, अभिनेत्री गिरिजा ओक, कवयित्री डॉ. भुवन मोहिनी, साक्षी तिवारी, शिखा अवधेश, श्रद्धा शौर्य, सान्या राय आणि नेहा गोडघाटे सहभागी होऊन काव्य सादर करतील.

# कांद्याला हमीभावासाठी अकोल्यात किसान सभेचे तीव्र आंदोलन

### तहसील कार्यालयासमोर कांदे ओतून निषेध । प्रति क्विंटल ३ हजार भाव व १५०० रुपये अनुदानाची मागणी

**● अकोले । वीरभूमी –**

कांद्याला किमान ३ हजार रुपये प्रति क्विंटल भाव मिळावा, कमी दरात कांदा विकलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १५०० रुपये अनुदान द्यावे तसेच हा निर्णय संपूर्ण राज्यभर लागू करावा, या प्रमुख मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने अकोले तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी तहसील कार्यालयाच्या प्रवेशद्वारात कांदे ओतून सरकारच्या धोरणांचा निषेध व्यक्त केला.



सध्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. राज्यभरातील बाजार समित्यांमध्ये कांद्याला अत्यंत कमी दर मिळत असून अनेक ठिकाणी हे दर उत्पादन खर्चापेक्षाही खाली गेले आहेत. वाहतूक, मजुरी, साठवणूक आणि शेतीवरील वाढता खर्च वजा जाता शेतकऱ्यांच्या हातात काहीच राहत नसल्याची भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.

अवकाळी पाऊस, हवामानातील बदल आणि वाढलेले उत्पादन खर्च यामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना बाजारातील पडलेल्या दरांचा दुहेरी फटका बसत आहे. केंद्र सरकारकडून वेळोवेळी लादण्यात येणारी कांदा निर्यातबंदी, अपुरी साठवणूक व्यवस्था आणि बाजार हस्तक्षेपाचा अभाव यामुळे कांदा उत्पादकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाल्याचे यावेळी सांगण्यात आले.

अखिल भारतीय किसान सभेचे महाराष्ट्र राज्य सचिव डॉ. अजित नवले यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. आंदोलनात सदाशिव साबळे, नामदेव भांगरे, एकनाथ मेंगाळ, राजाराम गंभीरे, तुळशीराम कातोरे, ज्ञानेश्वर काकड, संगीता साळवे, हेमलता शेळके, दत्ता गोंदके, बाळासाहेब भोर, अजित चौधरी, दत्ता कोंडार, योगेश भरितकर, बाळासाहेब मधे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी व कार्यकर्ते सहभागी झाले होते.

आंदोलनापूर्वी अकोले शहरातून जोरदार मिरवणूक काढण्यात आली. घोषणाबाजी करत शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यात आले.

यावेळी केरळचे विरोधीपक्ष नेते व माजी मुख्यमंत्री पिणराई विजयन यांच्या घरावर राजकीय सूडबुद्धीने ईडीची धाड टाकल्याचा आरोप करत केंद्र सरकारचाही निषेध करण्यात आला.

आंदोलनकर्त्यांनी सरकारवर शेतकरीविरोधी धोरणे राबविल्याचा आरोप केला. वारंवार लादण्यात येणाऱ्या कांदा निर्यातबंदीमुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे वक्त्यांनी सांगितले. तसेच कांद्याची साठवणूक क्षमता वाढविण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आली नसल्याने हा प्रश्न अधिक गंभीर झाल्याचे नमूद करण्यात आले.

कांद्याच्या प्रश्नावर दीर्घकालीन धोरण आखून साठवणूक क्षमता वाढवावी, निर्यातबंदीऐवजी निर्यात प्रोत्साहनाचे धोरण स्वीकारावे आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण द्यावे, अशा मागण्याही आंदोलनादरम्यान करण्यात आल्या.

आ. विवेक कोल्हे यांच्या पाठपुराव्याने

## मक्याची थकीत रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होण्यास सुरुवात

**● कोपरगाव । वीरभूमी–**

महाराष्ट्र शासनाच्या भरडधान्य खरेदी योजनेअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांकडून हमीभावाने खरेदी करण्यात आलेल्या मक्याच्या थकीत रकमेबाबत आमदार विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पणनमंत्री जयकुमार रावल यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला यश मिळाले असून राज्यातील शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रलंबित रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली असून या निर्णयाचे समस्त शेतकऱ्यांनी स्वागत केले आहे.

आ.विवेक कोल्हे यांनी राज्य शासनाकडे वेळोवेळी केलेल्या पाठपुराव्यामुळे महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना मक्याच्या खरेदीची थकीत रक्कम वेळेत मिळण्यास सुरुवात झाली असून, राज्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सन २०२५-२६ मध्ये राज्य सहकारी पणन महासंघामार्फत भरडधान्य खरेदी योजनेअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांकडून हमीभावाने मका खरेदी करण्यात आला होता. मात्र ८ मार्च ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत खरेदी झालेल्या मक्याची देयके शेतकऱ्यांना मिळाली नसल्याने राज्यातील अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बी-बियाणे, खते व इतर शेती साहित्य खरेदीसाठी शेतकऱ्यांना पैशांची अत्यंत आवश्यकता होती.

या गंभीर बाबीची दखल घेत आमदार विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पणनमंत्री जयकुमार रावल यांच्याकडे पत्राद्वारे तातडीने मागणी करून राज्यातील शेतकऱ्यांची थकीत रक्कम तत्काळ वर्ग करण्याची विनंती केली होती.

याबद्दल आ. विवेक कोल्हे यांनी मुख्यमंत्री, पणनमंत्री तसेच शासनाचे आभार व्यक्त केले असून, पुढील काळातही राज्यातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू राहील, असे त्यांनी सांगितले.

## लोणी व्यंकनाथ परिसरातील अवैध माती उत्खननाविरोधात जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

### महसूल बुडत असल्याचा आरोप । 'माती फेक आंदोलन'चा इशारा

**● श्रीगोंदा । वीरभूमी–**

अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ परिसरात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या अवैध माती उत्खनन आणि माती तस्करीप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते टिळक भोस यांनी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

> अवैध माती उपसण्याचा प्रताप काही माती तस्कर करत आहेत. त्यांना काही राजकीय तसेच महसूल विभागातील व्यक्तींचे पाठबळ असल्याचा संशय आहे. शेतकऱ्याने अल्प प्रमाणात माती किंवा मुरुम उपसल्यास तत्काळ दंडात्मक कारवाई केली जाते; मात्र मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या अवैध उत्खननाकडे दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे संबंधित माती तस्करांवर तात्काळ कारवाई करून दंडात्मक कारवाई न झाल्यास महसूल अधिकाऱ्यांविरोधात 'माती फेक आंदोलन' करण्यात येईल.
>
> – टिळक भोस, स्वराज्य जनजागृती परिषद, अहिल्यानगर

नागरिकांकडून सातत्याने येणाऱ्या तक्रारी तसेच विविध वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांच्या पार्श्वभूमीवर ही तक्रार करण्यात आली आहे. एमआयडीसी परिसरातील काळ्या मातीचे मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या उत्खनन करून ट्रक व डंपरच्या माध्यमातून वाहतूक केली जात असल्याचा गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या अवैध उत्खननामुळे शासनाचा महसूल बुडत असून पर्यावरणाची हानी, रस्त्यांची दुरवस्था, धूळप्रदूषण तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

महसूल विभाग, खनिकर्म विभाग आणि पोलिस प्रशासनाने संयुक्त कारवाई करून संबंधित ठिकाणी तात्काळ छापेमार मोहीम राबवावी, अवैध उत्खननासाठी वापरण्यात येणारे ट्रक, डंपर, जेसीबी व इतर यंत्रसामग्री जप्त करावी तसेच दोषींवर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम व खनिज नियमानुसार फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासोबतच या प्रकरणात कोणत्याही अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांचे संगनमत आढळल्यास त्यांच्यावरही कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शासनाचा बुडालेला महसूल वसूल करून भविष्यात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कायमस्वरूपी नियंत्रण यंत्रणा उभारावी, असेही तक्रारीत म्हटले आहे. सदर प्रकरण अत्यंत गंभीर असून प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अन्यथा जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# 'संदेश कॉम्प्युटर्स'च्या विद्यार्थ्यांची आनंदगड येथे शैक्षणिक सहल उत्साहात

### एमएस-सीआयटी विद्यार्थ्यांनी घेतला उच्च शिक्षणाचा प्रत्यक्ष अनुभव; पॉलिटेक्निक व फार्मसी कॉलेजला दिली भेट

**● अकोले । वीरभूमी–**

विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळावे या उद्देशाने अकोले येथील अग्रगण्य संगणक प्रशिक्षण संस्था 'संदेश कॉम्प्युटर्स'च्या वतीने एमएस-सीआयटी (चड-उखड) कोर्सच्या विद्यार्थ्यांसाठी आनंदगड या नामांकित शैक्षणिक संकुलात एक दिवसीय शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची माहिती घेत प्रत्यक्ष शैक्षणिक अनुभवाचा लाभ घेतला.

या शैक्षणिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी आनंदगड संकुलातील पॉलिटेक्निक डिप्लोमा कॉलेज तसेच फार्मसी महाविद्यालयाला भेट देऊन विविध अभ्यासक्रमांची माहिती जाणून घेतली. संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे व सचिव डॉ. अनिल रहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या महाविद्यालयांतील अत्याधुनिक प्रयोगशाळा, भव्य ग्रंथालय आणि आधुनिक शैक्षणिक सुविधा पाहून विद्यार्थी प्रभावित झाले.

विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्रातील करिअरच्या विविध संधींबाबत माहिती घेतली. तसेच संबंधित महाविद्यालयांतील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया, पात्रता निकष आणि भविष्यातील रोजगाराच्या संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे आणि सचिव डॉ. अनिल रहाणे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. पॉलिटेक्निक कॉलेजचे समन्वयक विद्याचंद्र सातपुते यांनी आजच्या डिजिटल युगात संगणक साक्षरतेसोबतच उच्च शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

स्पर्धेच्या युगात युवकांच्या हातात कौशल्य असणे अत्यावश्यक असून तांत्रिक शिक्षणाशिवाय पर्याय नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच 'संदेश कॉम्प्युटर्स'च्या या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले. यावेळी प्रा. संदीप थोरात यांनी संस्थेमध्ये सुरू असलेल्या विविध अभ्यासक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

या शैक्षणिक सहलीचे नियोजन 'संदेश कॉम्प्युटर्स'चे संचालक हेमंत मोरे यांनी केले. आनंदगड शैक्षणिक संकुलाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी बस तसेच चहा-नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली होती.

यावेळी संस्थेच्या उपप्राचार्या प्रा. प्राजक्ता आंबरे, प्रा. संदीप थोरात, प्रा. पूजा शेळके, प्रा. अजित येलमामे, प्रा. अक्षय घोडगे, तंत्रज्ञ तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.



भविष्यात करिअरची निवड करताना या शैक्षणिक सहलीचा मोठा फायदा होणार असल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. प्रत्यक्ष महाविद्यालयांना भेट देऊन प्रवेशासंदर्भातील शंकांचे निरसन झाल्यामुळे विद्यार्थ्यांनी 'संदेश कॉम्प्युटर्स'चे आभार मानले. ही सहल उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात संपन्न झाली.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले. संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# तनपुरेंच्या पक्षप्रवेशात रंगला दोन 'दादां'चा आलिंगन सोहळा

## मारलेल्या मिठीने आजोबा-नातवाच्या राजकीय इतिहासाला उजाळा | विखे-तनपुरे युतीच्या चर्चांना उधाण

**● अहिल्यानगर | वीरभूमी–** भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. मुंबईतील भाजपच्या प्रदेश कार्यालयात झालेल्या या सोहळ्यासाठी राहुरी, पाथर्डी आणि नगर तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या भाजप प्रवेशामागे भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांची महत्त्वपूर्ण आणि मुत्सद्दी भूमिका असल्याची चर्चा यावेळी पुन्हा एकदा अधोरेखित झाली. कार्यक्रमात बोलताना प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी, प्रश्नांची जाण असलेला आणि अभ्यासू तरुण नेता पक्षात आल्याने भाजपला निश्चितच बळ मिळेल, असे सांगितले.

पक्षप्रवेशानंतर प्राजक्त तनपुरे यांनी प्रथम रवींद्र चव्हाण आणि त्यानंतर डॉ. सुजय विखे पाटील यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यानंतर रंगलेल्या एका प्रसंगाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. आजोबांनंतर आता नातूही एकत्र आला, अशी मिश्किल टिप्पणी होताच सभागृहात एकच हशा पिकला.

राजकीयदृष्ट्या एकमेकांच्या विरोधात राहिलेल्या डॉ. सुजय विखे पाटील आणि प्राजक्त तनपुरे यांनी लोकसभा निवडणुकीत परस्परविरोधी भूमिका घेतली होती. मात्र बदलत्या राजकीय समीकरणांमध्ये आता हे दोन्ही नेते एकाच व्यासपीठावर आल्याने नव्या राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

यावेळी डॉ. सुजय विखे पाटील आणि प्राजक्त तनपुरे यांच्यातील आलिंगनाने उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव झालेल्या या मिठीला टाळ्यांचा कडकडाट आणि जल्लोषाची साथ मिळाली. या एका क्षणाने दोन्ही नेत्यांमधील नव्या राजकीय समीकरणांवर जणू शिक्कामोर्तब झाल्याची चर्चा कार्यकर्त्यांमध्ये रंगली.

राहुरीच्या राजकारणात विखे-तनपुरे यांची नवी राजकीय युती विकासाला नवी दिशा देईल, असा विश्वास तनपुरे समर्थकांनी व्यक्त केला. तसेच या पक्षप्रवेशानंतर राहुरी विधानसभा मतदारसंघातील राजकीय गणिते बदलण्याची शक्यता असल्याचे मतही अनेक कार्यकर्त्यांनी मांडले.

एकूणच, प्राजक्त तनपुरे यांच्या




भाजप प्रवेशापेक्षा डॉ. सुजय विखे पाटील आणि तनपुरे यांच्यातील जुळलेली राजकीय जवळीक आणि रंगलेला 'दोन दादां'चा आलिंगन सोहळाच या कार्यक्रमाचा प्रमुख चर्चेचा विषय ठरला.

# अनेक रुग्णालयांतील कर्मचाऱ्यांमध्ये सभ्यतेचा अभाव; रुग्णांकडून नाराजी व्यक्त

### उद्धट वागणूक, अपुऱ्या सुविधा आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा प्रश्न ऐरणीवर

**● कोपरगाव | वीरभूमी–** रुग्णांच्या आजाराचे योग्य निदान करून आवश्यक वैद्यकीय व शस्त्रक्रिया उपचारांच्या माध्यमातून त्यांना आरोग्यदायी जीवन देण्यासाठी उभारलेली अत्याधुनिक सुविधा असलेली वास्तू म्हणजे रुग्णालय होय. विशेषतः कोरोनानंतर रुग्णालयांना देवाच्या मंदिराइतके महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, अशा ठिकाणी कार्यरत असलेले काही कर्मचारी जर रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांशी उद्धटपणे वागत असतील, तर त्यांना प्रशिक्षित कर्मचारी म्हणावे का, असा प्रश्न अनेक रुग्णांकडून उपस्थित केला जात आहे.




कोपरगाव शहरात विविध आजारांवरील उपचारांसाठी अनेक नामांकित तज्ज्ञ डॉक्टरांची आधुनिक व सुसज्ज रुग्णालये सुरू आहेत. शहरातील डॉक्टरांच्या तज्ज्ञतेबाबत नागरिकांमध्ये विश्वास असून ग्रामीण भागातील अनेक गोरगरीब रुग्ण उपचारासाठी येथे येत असतात. मात्र, अनेक रुग्णालयांमध्ये वाहनतळाची अपुरी व्यवस्था, पिण्याच्या शुद्ध व थंड पाण्याचा अभाव अशा मूलभूत सुविधांची कमतरता जाणवत असल्याचे चित्र आहे.

याशिवाय अनेक रुग्णालयांमधील कार्यालयीन कर्मचारी रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांशी समजून घेण्याच्या भाषेत संवाद साधत नसल्याची तक्रार वारंवार पुढे येत आहे. विशेषतः ज्येष्ठ, अशिक्षित किंवा ग्रामीण भागातून आलेल्या रुग्णांना योग्य माहिती देण्याऐवजी उद्धट भाषेत बोलले जात असल्याचे प्रकार घडत असल्याची चर्चा आहे.

काही ठिकाणी या कारणांमुळे रुग्ण व कर्मचाऱ्यांमध्ये किरकोळ वाद निर्माण झाल्याच्याही घटना घडल्या आहेत. त्यामुळे भविष्यात मोठा अनर्थ होण्यापूर्वी रुग्णालय प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

रुग्णालय आणि ओपीडी चालकांनी आपल्या संस्थांमध्ये वैद्यकीयदृष्ट्या प्रशिक्षित कर्मचारी नेमावेत तसेच विद्यमान कर्मचाऱ्यांना रुग्णांशी नम्रपणे व सुसंवादाने कसे वागावे याचे प्रशिक्षण देणे आवश्यक असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.

रुग्ण हा डॉक्टरांना देव मानून उपचारासाठी रुग्णालयात येत असतो. अशावेळी त्याच रुग्णाला रुग्णालयातील कर्मचाऱ्यांकडून अपमानास्पद वागणूक मिळत असेल, तर हे कितपत योग्य आहे, याचा विचार संबंधित रुग्णालय प्रशासनाने करण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# काजवा पर्यटनादरम्यान वनरक्षकास मारहाण; पिता-पुत्राविरुद्ध राजूर पोलिसांत गुन्हा

### पांजरे नाक्यावर वाहन तपासणीदरम्यान वाद

**● अकोले | वीरभूमी –** सध्या काजवे पाहण्यासाठी पर्यटक अकोले तालुक्यातील भंडारदरा परिसरात मोठ्या प्रमाणावर गर्दी करत आहेत. वन्यजीव व वनविभाग क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी वनखात्यामार्फत पर्यटकांकडून प्रवेश शुल्क आकारले जात असल्याने पांजरे नाक्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. यामुळे वाहनचालक आणि वनखात्याचे अधिकारी-कर्मचारी यांच्यात अनेकदा वादाच्या घटना घडत असल्याचे चित्र आहे. अशाच एका घटनेत वनरक्षकास शिवीगाळ करून मारहाण करण्यात आल्याची घटना पांजरे नाक्यावर घडली असून, याप्रकरणी पिता-पुत्राविरुद्ध राजूर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत वनरक्षक चंद्रकांत भरत तळपाडे यांनी राजूर पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ते पांजरे नाक्यावर प्रभारी म्हणून नियुक्त होते. भंडारदरा वन्यजीव वनविभागात सध्या काजवा हंगाम सुरू असल्याने मुरशेत गावाच्या शिवारातील पांजरे नाक्यावर दररोज येणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांची तपासणी करून पर्यटन शुल्क आकारले जाते आणि त्यानंतर पर्यटकांना अभयारण्य क्षेत्रात प्रवेश दिला जातो.

घटनेच्या वेळी त्यांच्यासोबत परशुराम हरी पदमेरे, नथू गोविंद उघडे, करण विजय सोनवणे, गणेश धोडू उघडे, अशोक चाहू उघडे, संतोष तुकाराम उघडे व पार्थ गोरख भांगरे हे नाका मदतनिस म्हणून कार्यरत होते.

दरम्यान, एमएच ०५ ईक्यू २६५१ क्रमांकाची मारुती सुझुकी कंपनीची पांढऱ्या रंगाची एक्सएल-६ ही कार पांजरे नाक्यावर आली. संबंधित वाहनाच्या डॅशबोर्डवर पोलीस अशी पाटी तसेच लाल-निळ्या रंगाचे एलईडी दिवे लावलेले होते. वाहनांची तपासणी सुरू असताना पर्यटकांच्या गाड्या रांगेत उभ्या असल्याने संबंधित चालकास वाहन रांगेत उभे करण्यास सांगितले. मात्र, त्यास याचा राग आला.

मी मुरशेत गावचा रहिवासी आहे, मी लाईनमध्ये थांबणार नाही, असे म्हणत त्याने वनरक्षकास शिवीगाळ केली. त्यानंतर त्याने आपल्या वडिलांना फोन करून माझे वडीलही पोलीस आहेत, थांब तुझ्याकडे पाहतोच, अशी धमकी दिल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

यानंतर संबंधिताने वाहन नाक्यावरून पुढे नेत चौकाजवळ उभ्या असलेल्या कर्मचाऱ्याच्या अंगावर वाहन घालण्याचा प्रयत्न केल्याचेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर काही वेळातच संबंधित युवकाचे वडील घटनास्थळी आले. वनरक्षक गणवेशात असतानाही त्यांनी कॉलर पकडून तोंडावर, डाव्या कानशिलात तसेच पाठीवर मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच माझ्या मुलाला तुम्ही का थांबवले? असे म्हणत शिवीगाळ करण्यात आली. यानंतर साई बाळू बांगर व लक्ष्मण बांगर (रा. मुरशेत, बांगरवाडी) यांनी तुला काय करायचे ते कर, पुन्हा आमच्या नादी लागलास तर जिवे मारून टाकू, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या प्रकरणी साई बाळू बांगर व मुंबई येथे कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी लक्ष्मण बांगर यांच्याविरोधात सरकारी कामात अडथळा आणणे, मारहाण, शिवीगाळ व धमकी दिल्याप्रकरणी राजूर पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार करीत आहेत.

# निघोज ग्रामस्थांचे धार्मिक संस्कृती जपण्यात मोठे योगदान

## आमदार काशिनाथ दाते | निघोज येथे श्रीमद् भागवत महापुराण कथेचा शुभारंभ

**● निघोज | वीरभूमी–** धार्मिक संस्कृती वाढविण्यासाठी निघोज ग्रामस्थांचे योगदान मोठे असून, सोमनाथ महाराज वरखडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी श्रीमद् भागवत महापुराण कथेचे आयोजन करून धार्मिक संस्कृतीला पाठबळ देणारे कार्य केले असल्याचे प्रतिपादन आमदार काशिनाथ दाते यांनी केले.

निघोज येथील कपिलेश्वर मंगल कार्यालयात गुरुवार दि. २८ रोजी श्रीमद् भागवत महापुराण कथेचा शुभारंभ आमदार काशिनाथ दाते तसेच माजी आमदार पोपटराव गावडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व संत ज्ञानेश्वर, प्रभू रामचंद्र महाराज आणि माता श्री मळगंगा देवी यांच्या पूजनाने करण्यात आला.

या सातदिवसीय कथेमध्ये कथाप्रवक्ते भागवताचार्य बाबा महाराज खामकर हे निरुपण करणार आहेत. यावेळी आमदार दाते म्हणाले की, निघोज परिसरात वर्षभर धार्मिक व सेवाभावी उपक्रम सातत्याने सुरू असतात. भारतीय संस्कृतीमध्ये धार्मिक परंपरांना विशेष महत्त्व असून अशा कार्यक्रमांमुळे समाजात सकारात्मक विचारांचा प्रसार होत असतो.

भागवताचार्य बाबा महाराज खामकर हे अनेक वर्षांपासून प्रवचन आणि कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य करीत आहेत. या भागवत कथेचा निघोज व परिसरातील भाविकांना मोठ्या प्रमाणात लाभ होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

तसेच सोमनाथ महाराज वरखडे, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे माजी अध्यक्ष प्रभाकरशेठ कवाद, माजी कोषाध्यक्ष ज्ञानदेव लंके, संदीप पाटील तसेच वराळ जनसेवा फाउंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ आणि ग्रामस्थ लोकसहभागातून या धार्मिक कार्यक्रमासाठी सहकार्य करत असल्याचे त्यांनी नमूद केले. धार्मिक सेवाभाव आणि संस्कृती जतन करण्याचे कार्य अशाच प्रकारे सातत्याने होत राहणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

माजी आमदार पोपटराव गावडे यांनीही या धार्मिक उपक्रमाचे कौतुक करताना सांगितले की, सोमनाथ महाराज वरखडे हे परिसरात सातत्याने धार्मिक कार्यक्रम आयोजित करून समाजात अध्यात्मिक वातावरण निर्माण करण्याचे कार्य करीत आहेत.



यावेळी शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख डॉ. भास्करराव शिरोळे, सोमनाथ महाराज वरखडे, प्रभाकरशेठ कवाद, ज्ञानदेव लंके, राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष रखमाजी कापसे, माजी सरपंच भास्कर उचाळे, ज्येष्ठ मार्गदर्शक नामदेवराव थोरात, माजी सरपंच चित्राताई वराळ पाटील, संदीप पाटील उद्योग समूहाचे अध्यक्ष आप्पासाहेब वराळ पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा कार्याध्यक्षा सुधामती कवाद, बाळासाहेब लामखडे, रोहिदास लामखडे, शरद ठुबे, रामदास लंके, शिवाजीराव वराळ, बाबाजी तनपुरे, रामदास नरड, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष भास्कर कवाद, पत्रकार संपतराव वैरागर, दत्तात्रय लंके, बाबाजी वाघमारे, भगवान श्रीमंदीलकर, माजी ग्रामपंचायत सदस्या आशाताई वरखडे, सुमन कवाद आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक शरद ठुबे यांनी केले, तर कपिलेश्वर उद्योग समूहाचे अध्यक्ष सोमनाथ वरखडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.